# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर

113 (अ), सिद्धेश्वर पेठ (एस.बी.आय. ट्रेझरी शेजारी) सोलापूर - 413 001.

---

**दिनांक : 30 मार्च 2024**

## अंतीम गुणवत्ता यादीमधील दुरुस्ती

**जाहिरात कोड : पी-100** **पदाचे नाव : लिपिक** **परीक्षा दिनांक : 03 मार्च 2024.**

दि.3 मार्च 2024 रोजी लिपिक पदासाठी परीक्षा घेण्यात आलेली होती. त्यास अनुसरून पात्र असलेल्या उमेदवारांची मौखिक मुलाखत दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड (शेड्यूल्ड बँक) येथे दि. 19, 20 आणि 21 मार्च 2024 रोजी घेण्यात आलेल्या आहेत. लेखी परीक्षेत प्राप्त झालेले गुण आणि मौखिक मुलाखत यामध्ये मिळालेले एकत्रित गुण विचारात घेऊन अंतीम गुणवत्ता यादी दि.28 मार्च 2024 रोजी https://surbanksassociations.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन लेखी परीक्षेत प्राप्त झालेले गुण व मुलाखतीमधील कामगिरीनुसार दिलेले गुण याचे एकत्रिकरण करताना झालेल्या मुद्रणदोषामुळे अंतीम गुणवत्ता यादीमध्ये अनुक्रमांक 109, आसन क्रमांक S20240588 या उमेदवाराचा समावेश झालेला आहे; सदर उमेदवारास मिळालेले गुण कमी असल्याने त्यांचे नाव अंतीम गुणवत्ता यादीतून वगळण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

त्याऐवजी प्रतिक्षा यादीतील अनुक्रमांक 1, आसन क्रमांक S20240556 यांना अंतीम गुणवत्ता यादीत 110 वे स्थान देण्यात येत आहे आणि प्रतिक्षा यादीत रिक्त झालेल्या जागा अनुक्रमांक 22 साठी गुणानुक्रमानुसार लेखी परीक्षेतील आसन क्रमांक S20240489 यांची निवड करण्यात येत आहे. यास अनुसरून सुधारित अंतीम गुणवत्ता यादी व सुधारित प्रतिक्षा यादी पुन्हा प्रसिद्ध केलेली आहे.

संबंधितांनी सदर बदलाची नोंद घ्यावी ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर